# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 10 January 2026

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १० जानेवारी २०२६ सकाळी ७.१० मि.

****

- संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला येत्या २८ जानेवारीपासून प्रारंभ
- लालूप्रसाद यादव यांच्याविरोधात आरोप निश्चितीचे दिल्ली न्यायालयाचे आदेश
- मनपा निवडणुकीसाठी राजकीय पक्षांकडून डिजिटल प्रचारावर भर
- हैदराबाद मुक्तीसंग्रामात स्त्रियांच्या योगदानाबाबत व्यापक लेखनाची गरज- इतिहासतज्ज्ञ डॉ उमा चक्रवर्ती यांच्याकडून व्यक्त

आणि

- मलेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पी. व्ही. सिंधू उपांत्य फेरीत दाखल

****

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला येत्या २८ जानेवारीपासून सुरुवात होणार आहे. संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी सामाजिक प्रसार माध्यमाद्वारे ही माहिती दिली. अर्थसंकल्पाचं पहिलं सत्र १३ फेबुवारीला संपेल तर दुसरं सत्र ९ मार्च रोजी सुरु होईल, ते २ एप्रिल पर्यंत चालेल, असं रिजिजू यांनी सांगितलं आहे.

****

माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचं यावर्षी पुनर्गठन करण्यात येणार आहे. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिल्लीत ही घोषणा केली. या पुनर्गठनामध्ये नवीन कार्यप्रणाली विकसित करण्याचाही समावेश असून सर्जकांच्या नव्या पिढीला आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडलं जाणार आहे. दरम्यान वैष्णव यांनी काल नवी दिल्ली इथं क्रिएटर्स कॉर्नरचं उद्घाटन केलं. डिजिटल व्यासपीठांवर सर्जनशील आशयाचं प्रदर्शन आणि प्रसार करणं तसच प्रोत्साहन देणं हा उपक्रमाचा उद्देश आहे.

****

राष्ट्रीय जनता दलाचे प्रमुख आणि माजी रेल्वेमंत्री लालू प्रसाद यादव यांच्यासह त्यांचं कुटुंब आणि इतरांविरोधात जमीन घोटाळाप्रकरणी आरोप निश्चित करण्याचे आदेश नवी दिल्लीतल्या न्यायालयानं दिले आहेत. रेल्वेमंत्री असताना लालूप्रसाद यादव यांनी नोकऱ्यांच्या बदल्यात जमीन मिळवल्याचा आरोप विशेष न्यायाधीश विशाल गोगणे यांनी ग्राह्य धरला. २३ जानेवारीपर्यंत हे आरोप निश्चित करावेत, असं न्यायालयानं सांगितलं आहे.

****

राज्यातल्या महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराला आता वेग आला आहे. उमेदवार तसंच सर्व पक्षांचे नेते मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी डिजिटलं उपकरणं, तंत्रज्ञानासह विविध माध्यमांचा उपयोग करत आहेत. पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रचार करण्यासाठी भाजपाने एआयचा वापर करून केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध कल्याणकारी योजना मतदारापर्यंत पोहोचवण्याची मोहीम सुरू केली आहे. तर काँग्रेस पक्षही समाजमाध्यमाद्वारे मतदारांशी डिजिटल संपर्क साधत आहे.विविध समाजमाध्यम व्यासपीठांचा वापर करत चित्रफीत, रिल आणि मेसेजद्वारे उमेदवारांकडून प्रचार केला जात आहे.

****

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सेनेशी युती करणं ही मनसेची सर्वांत मोठी चूक असून, या आघाडीमध्ये सर्वाधिक नुकसान मनसेचे होईल, असं मुख्यमंत्री तथा भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. मुंबई इथं महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर माध्यमांना दिलेल्या मुलाखतीत काल ते बोलत होते.

****

राजकारणातील वैचारिक बांधिलकी कमी होत असून बहुतांश राजकीय पक्षांनी त्यांची मूळ विचारधारा बाजूला ठेवली आहे, असं मत महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केलं आहे. काल एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत ते बोलत होते. पक्षाचे समर्थक वाढवण्यासाठी राजकीय पक्ष  विविध मार्ग अवलंबत असल्याबद्दल पवार यांनी चिंता व्यक्त केली.

****

नाशिक महापालिका निवडणुकीसाठी उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उध्दव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची काल पहिली संयुक्त सभा झाली. कुंभमेळ्यासाठी झाडांची कत्तल यासह अनेक विषयांवर त्यांनी टीका केली.

****

परळी नगरपालिकेत राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना आणि MIM या पक्षांनी एकत्र येऊन सत्ता स्थापन केल्याचा दावा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते अंबादास दानवे यांनी केला आहे. दरम्यान, शिवसेना नेते संजय शिरसाट यांनी एमआयएम संदर्भातले आरोप फेटाळून लावले आहेत. शिवसेनाच MIM ला हद्दपार करेल. त्यामुळे अधिक माहिती घ्यावी, असा सल्ला शिरसाट यांनी दानवे यांना दिला.

****

भाजपचे नेते तथा महसुलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची काल लातूर तसंच छत्रपती संभाजीनगर इथं प्रचारसभा झाली. दरम्यान, लातूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीत जनसेवा माथाडी आणि श्रमिक कामगार संघटनेने काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीला पाठींबा दिली आहे. आमदार अमित देशमुख यांच्याकडे पाठिंब्याचं पत्र काल सुपूर्द करण्यात आलं.

****

हैदराबाद मुक्तीसंग्रामात मराठवाड्यातील स्त्रियांनी दिलेल्या योगदानाबाबत व्यापक लेखनाची गरज, प्रख्यात इतिहासतज्ज्ञ डॉ उमा चक्रवर्ती यांनी व्यक्त केली आहे. छत्रपती संभाजीनगर इथं डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात काल राष्ट्रीय चर्चासत्रातल्या बीजभाषणात डॉ चक्रवर्ती बोलत होत्या. विद्यापीठ नामांतर चळवळीतही स्त्रियांच्या योगदानाची पुरेशी दखल घेतली नसल्याकडे त्यांनी लक्ष वेधलं. चर्चासत्रात दुसऱ्या सत्रात सामाजिक कार्यकर्त्या मंगल खिवंसरा यांनी "मराठवाड्यातील स्त्री चळवळ आणि माध्यमांची भूमिका" या विषयावर मार्गदर्शन केलं.

****

कांतारा – द लिजंट चॅप्टर १, तन्वी द ग्रेट, महावतार नरसिम्हा, टुरिस्ट फॅमिली, आणि सिस्टर मिडनाइट हे ५ भारतीय चित्रपट, ऑस्करच्या उत्कृष्ट चित्रपट श्रेणीसाठी पात्र ठरले आहेत. अकादमी ऑफ मोशन पिक्चरच्या वतीनं ही घोषणा करण्यात आली. याशिवाय दशावतार, महामंत्रा, पेपर फ्लॉवर, पारो हे ४ चित्रपट सर्वसाधारण श्रेणीसाठी पात्र आहेत. या सर्व चित्रपटांमधून ऑस्करसाठी नामांकित झालेल्या चित्रपटांची यादी २२ जानेवारीला जाहीर होईल.

****

भारताची आघाडीची बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधू हिनं मलेशिया ओपन सुपर 1000 स्पर्धेच्या उपांत्य फेरीत धडक मारली. काल उपांत्यपूर्व लढतीत सिंधूने पहिला गेम २१–११ असा जिंकला. त्यानंतर यामागुची हिने दुखापतीमुळे माघार घेतली. यामुळे सिंधू स्पर्धेच्या उपांत्य फेरीत दाखल झाली. दरम्यान, या स्पर्धेच्या पुरुष दुहेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत भारतीय जोडी सात्विक साईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांचं आव्हान संपुष्टात आलं आहे.

****

केंद्र सरकारनं नुकतंच विकसित भारत जी राम जी विधेयक संमत केलं. या योजनेमुळे गावातील पायाभूत सुविधा आणि मुलभूत सेवा सक्षम होणार आहेत अशी माहिती लातूर जिल्ह्यातल्या एकुर्का रोड येथील संजय सोपानराव कांबळे यांनी दिली. ते म्हणाले –

**बाईट – लातूर – संजय सोपानराव कांबळे**

****

पहिलं राज्यस्तरीय ग्रामीण, कृषी आणि सहकार साहित्य संमेलन येत्या १४ आणि १५ फेब्रुवारी रोजी रत्नागिरी जिल्ह्यात चिपळूण तालुक्यातल्या मांडकी पालवणमध्ये होणार आहे. ज्येष्ठ साहित्यिक आणि रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ. तानाजीराव चोरगे यांची संमेलनाध्यक्ष म्हणून एकमताने निवड करण्यात आली आहे. ग्रामीण, कृषी आणि सहकार या तिन्ही विषयांतलं नामवंत लेखकांचं साहित्य जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहोचावं हा या संमेलनाचा उद्देश आहे.

****

राष्ट्रमाता जिजाऊ जन्मोत्सव समितीच्या विविध पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. यात धाराशिवच्या द्रौपदी नानासाहेब खोत यांना राजमाता जिजाऊ पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. येत्या सोमवारी १२ तारखेला धाराशिव इथे हे पुरस्कार वितरित करण्यात येणार आहेत.

****

शीखांचे गुरु तेगबहादूर यांच्या ३५० व्या हुतात्मा वर्षानिमित्त नांदेड इथं २४ आणि २५ जानेवरी विशेष कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. या कार्यक्रमासाठी गृहमंत्री अमित शहा, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले तसंच श्री सचखंड गुरुद्वारा बोर्डाचे अध्यक्ष डॉ. विजयसिंह सतबीर सिंघ यांनी काल नांदेड इथं

पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. या सोहळ्यानिमित्त देशभरातून सुमारे दहा लाख भाविक नांदेडला येतील, असा अंदाज आहे.

****

लातूर शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कर्मचाऱ्यांचं दुसरं प्रशिक्षण काल पार पडलं. हे प्रशिक्षण दोन सत्रात  घेण्यात आलं.

छत्रपती संभाजीनगर इथंही काल या प्रशिक्षणाचं दुसरं सत्र घेण्यात आलं. दरम्यान, मतदान यंत्रं सील करण्याच्या कामालाही काल प्रारंभ झाला.

****

तुळजापूर इथल्या तुळजाभवानी मंदिर विकास आरखड्यासाठी राज्यशासनाने एक हजार ८६५ कोटी रुपये निधी मंजूर केला होता. त्यातल्या ५५५ कोटी ८० लाख रुपयांच्या प्रमुख चार कामांच्या निविदेस काल मान्यता देण्यात आली

****

परभणी जिल्ह्यात सेलू इथं संगीतरत्न हरिभाऊ चारठाणकर संगीत महोत्सवाचं आज आणि उद्या आयोजन करण्यात आलं आहे. साई नाट्यगृहात सायंकाळी साडे पाच वाजता सुरू होणाऱ्या या महोत्सवात विविध नामांकित तसंच उदयोन्मुख कलाकार गायन, नर्तन आणि वादनाचा कलाविष्कार सादर करणार आहेत.

****

राज्यात काल अहिल्यानगर इथं सर्वात कमी साडे सात अंश तर तर पुण्यात साडे आठ अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. मराठवाड्यात नांदेड इथं नऊ पूर्णांक आठ, छत्रपती संभाजीनगर इथं साडे दहा तर धाराशिव तसंच परभणी इथं अकरा पूर्णांक दोन, दशांश सेल्सियस तापमानाची नोंद झाली

****